प्रेसनोट दि. २८/०८/२०१८

## सिंहगड रोड येथील लॉजवर छापा
## ३ सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायतुन सुटका
## लॉज मॅनेजर व साथीदार अटकेत

दि.२७/०८/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, यांना पोलीस हवालदार नितिन तरटे यांचे कडुन माहीती मिळाली की, "स्वागत लॉजींग" न-हे नवले ब्रीज जवळ, सिंहगड रोड पुणे येथील लॉजमध्ये इसम नामे मयंककुमार पांडे व त्याचा साथीदार शंभु यादव हे महिलांना वेश्या व्यवसायासाठी प्राप्त करुन घेवुन त्यांना पैशाचे अमिष दाखवुन त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त करुन त्यांचे कडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच सिंहगड पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती संगिता यादव यांनी संयुक्त कारवाई करुन सिंहगड रोड परिसरातील "स्वागत लॉजींग", न-हे नवले ब्रीज जवळ, सिंहगड रोड पुणे येथे चालत असलेल्या लॉजवर वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान ३ महाराष्ट्रीन सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारा १) मयंककुमार भगवान पांडे वय-२४ वर्षे धंदा- मॅनेजर रा. मु. फाजलगंज पो. सासाराम जि.रोहतास राज्य बिहार २) शंभु तुफानीसिंग यादव वय-४० वर्षे रा. स्वागत हॉटेल पुणे. मुळगाव- तमारी पो.ओदार ठाणे सुनाहन, जि.केमुरभबुआ राज्य बिहार याचे विरुध्द सिंहगड रोड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३७६/२०१८ इटपा कायदा कलम ३,४,५ सह भादंवि कलम ३७० व ३७० अ, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपींना कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. २९००/- रुपये, २ मोबाईल फोन व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. शिरिष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, सपोनि अनिता खेडकर, पोउनि आनंत व्यवहारे, नरेश बलसाने, ज्ञानेश्वर देवकर, राजाराम घोगरे, राजेद्र कचरे, राजेद्र लोखंडे, अनुराधा धुमाळ, गीतांजली जाधव, सुप्रिया शेवाळे, नितिन तेलंगे, राजेद्र ननावरे, निलेश पालवे, संदीप गायकवाड, यांनी व सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती संगिता यादव व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.